साप्ताहिक

# अनंत विचार

भारत सरकार मान्यताप्राप्त

संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com

अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.२ एप्रिल २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३५ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## लोकसभेच्या रणधुमाळीत महावितरणकडून दरवाढ

सोलापूर - एकीकडे लोकसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे महावितरणने महाराष्ट्रातील जनतेला मोठा झटका दिला. महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटर कमिशनने १ एप्रिलपासून वीजबिलात सरासरी ७.५० टक्क्यांची वाढ केली असून, स्थिर आकारातही १० टक्के दरवाढ केली आहे. ऐन उन्हाळ्यात महावितरणने वीजदरवाढीचा ग्राहकांना झटका दिला आहे. आधीच महागाईची झळ सोसणाऱ्या नागरिकांना यंदा उन्हाळ्याच्या दिवसांत भरमसाठ बिल भरावे लागणार आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने द्विवार्षिक वीज दरवाढीला मंजुरी दिली होती. गेल्या आर्थिक वर्षात (२०२३-२४) वीजबिलात सरासरी ७.२५ टक्के, तर या आर्थिक वर्षात (२०२४-२५) वीजबिलात ७.५० टक्के अशी एकूण सरासरी १४.७५ टक्के वाढ झाली आहे. स्थिर आकारातही गेल्या वर्षी १० आणि या वर्षी १० टक्के अशी वीस टक्के वाढ झाली आहे. घरगुतीसह व्यापारी,शेतकरी,उद्योग अशा सर्वच वर्गवारींतील ग्राहकांना ही दरवाढ लागू झाली आहे. राज्यात उन्हाचा चटका वाढल्याने विजेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा काळातच वीजदर वाढीचा शॉक ग्राहकांना बसणार आहे. दोन वर्षांसाठी लादलेली ही दरवाढ ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री लावणारी ठरणार असून, उन्हाळ्यात विजेचा वापर वाढणार असल्याने ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री बसणार आहे.

ऐन उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे एसी,कूलरचा वापर वाढला आहे. दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशावर मोठा ताण येणार आहे. वीज दरवाढीचा फटका घरगुती ग्राहकांसोबतच उद्योग,कृषी आदी संवर्गातील वापरकर्त्यांना बसणार आहे. पेट्रोल,डिझेल,सिलिंडर,खाद्य तेल आदी जीवनावश्यक वस्तूंच्या झालेल्या भरमसाठ वाढीमुळे नागरिक महागाईने आधीच हवालदिल आहेत असे असताना महावितरणकडून स्थिर आकार, इंधन समायोजन आकार यात वाढ करून सर्वसामान्य जनतेला दरवाढीचा शॉक दिला आहे.

## भरधाव ट्रकची ट्रॅक्टरला धडक, मंगळवेढ्यातील चौघांचा मृत्यू

मंगळवेढा : रत्नागिरी-नागपूर महामार्गावर सांगली जिल्ह्यातील आगळगाव फाटा येथे भीषण अपघात झाला असून ट्रॅक्टरला भरधाव येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात मंगळवेढा तालुक्यातील चारजण ठार तर आठ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन महिला,एक पुरुष आणि एक लहान मुलीचा समावेश आहे. जखमी यांच्यावर मिरजेच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


हा अपघात मंगळवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास कवठे महांकाळ तालुक्यातील रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील आगळगाव गावानजीक झाला. या अपघातातील सर्व मृत व जखमी मंगळवेढा तालुक्यातील असून या अपघातात शालन दत्तात्रय खांडेकर (वय ३०, रा. शिरनांदगी) यांच्यासह लगमा तम्मा हेगडे (वय ३५), दादा आप्पा ऐवळे (वय १७) व निलाबाई परशुराम ऐवळे (वय वर्षे तीन, तिघेही रा. चिखलगी, ता. मंगळवेढा) अशा चौघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

ऊसतोडी संपवून ऊसतोड मजूर ट्रॅक्टरमधून परत मंगळवेढ्याकडे निघाले होते. कवठेमहांकाळ तालुक्यातील आगळगाव फाटा येथे भरधाव येणाऱ्या ट्रकने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चारजण ठार झाले तर आठ जण गंभीर जखमी झाले. जखमींवर मिरज शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,कवठे महांकाळ तालुक्यातील रत्नागिरी- नागपूर राष्ट्रीय महामार्गावर आगळगाव गावानजीक या सर्वांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर (केए २८- टीबी ३५६९) अचानकपणे नादुरुस्त झाला.त्यावेळी ट्रॅक्टर चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला घेऊन दुरुस्ती सुरू केली होती. याच सुमारास मिरज शहराकडून सांगोला शहराकडे निघालेल्या मालट्रक (एपी ३९- यूएम ५३८८) या वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती, की हा ट्रॅक्टर तब्बल ७० ते ८० फूट पुढे फरफटत गेला. या अपघातग्रस्त ट्रॅक्टरमधून एकूण २१ ऊसतोड मजूर आपल्या गावी परतत होते. त्यात या ट्रॅक्टरमधील काही मजुरांच्या अंगावरून ट्रक गेल्याने चौघे जागीच ठार झाले, तर दहाजण जखमी झाले. या जखमींमधील दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

## ५ एप्रिलला कोकाटे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश- औदुंबर महाडिक

सोलापूर - टेंभुर्णीतील व माढा तालुक्यातील संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये शुक्रवार दिनांक ५ एप्रिल २०२४ रोजी दुपारी एक वाजता पक्षाचे अध्यक्ष व देशाचे नेते शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, निरीक्षक शेखर माने, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, माढा तालुका अध्यक्ष औदुंबर देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये प्रदेश कार्यालय मुंबई या ठिकाणी संजय कोकाटे हे कार्यकर्त्यांसह प्रवेश करणार आहेत, अशी माहिती तालुकाध्यक्ष औदुंबर महाडिक यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.



यावेळी संजय कोकाटे म्हणाले की माढा लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने जो उमेदवार देतील त्या उमेदवाराला जास्तीत जास्त मताधिक्क्याने निवडून आणण्याचे काम सर्वजण मिळून करू. या पत्रकार परिषदेला उपस्थित विनोद पाटील,सरपंच रामचंद्र टकले, बेंबळ्याचे वाय.जी.भोसले उपस्थित होते.

## प्रगतशील सोलापूरचे स्वप्न होतंय साकार, जनतेच्या मनात पुन्हा एकदा मोदी सरकार - राम सातपुते



पंढरपूर : प्रगतशील सोलापूरचे स्वप्न होतंय साकार,जनतेच्या मनात पुन्हा एकदा मोदी सरकार असा नारा महायुतीचे लोकसभेचे उमेदवार राम सातपुते यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातील ओझेवाडी येथे पंडितराव भोसले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटीप्रसंगी बोलताना दिला आहे.

या भेटीदरम्यान भोसले कुटूंबीयाने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी पंडितराव भोसले यांनी लोकसभा निवडणुकीसंदर्भात चर्चा करत विजयासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अनवली गावाला भेट दिली असता अनवली गावचे सरपंच वल्लभ घोडके यांनी समस्त गावकऱ्यांच्या वतीने स्वागत करत सत्कार केला. यावेळी वल्लभ घोडके यांनी संपूर्ण अनवली गाव मोदीजींना पुन्हा एकदा पंतप्रधानपदी पाहण्यासाठी उत्सुक असून त्यासाठी आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत असा विश्वास दिला.

यादरम्यान युवा नेते प्रणव मालक परिचारक यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सशक्त, समृद्ध आणि विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी सोलापुरातून कमळाला मोठ्या मताधिक्याने विजयी करून आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करण्याचा निर्धार केला. तसेच मोदीजींना पुन्हा एकदा पंतप्रधानपदी पाहण्यासाठी अहोरात्र काम करण्याचे आश्वसन दिले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, भाजपा प्रभारी अक्षय वाडकर, हरिष गायकवाड, राजश्री भोसले, पंढरपूरचे उपसभापती सिताराम नागणे, सुभाष मस्के , सुनिल भोसले, संतोष घोडके, बबन जाधव, किसना भुताडे, विनोद गायकवाड, गणेश पंडित, दीपक पंडित, हेमंत दाडगे, अनंत वाघ, बाळासो बुपनेर, हिरालाल रोख, सतीश घाडगे, दादा घाडगे, लक्ष्मण शिंदे, अर्जुन कोळी, समाधान जाधव, रामभाऊ दिघे, जयसिंग भुसनर, संतोष भिंगारे, रामभाऊ गायकवाड, महादेव शिंदे, दिलीप गुरव, बुवा शिंदे, सुदाम मोरे, अनिल दांडगे, अभिजित गुरव,नवनाथ बंगाळे, भास्कर मोरे, विजय मोरे, संजय माळी, अजित शिंदे, औदूंबर दिसले, विजय सरतापे, किसान मोर्चा भाजपा प्रदेश सदस्य विश्रांती भुसनर, शिवदास लाड, दत्ता लाड, दादा मोटे, रामभाऊ जाधव, रणजित जाधव, लक्ष्मण गोडसे , भास्करराव यादव, विजय शिराम, पुरुषोत्तम पवार, अभिजित यादव, नितीन लाड, श्रीनिवास जगदाळे तसेच ग्रामस्थ आणि युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंगळवेढा तालुक्यातील अपघातग्रस्त ऊसतोड कामगारांच्या कुटूंबियांना आ.प्रणिती शिंदे यांचे कडून प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत

मंगळवेढा - तालुक्यातील अपघातात मृत पावलेल्या ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांचेकडून प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. आज मंगळवेढा तालुक्यामध्ये लोकसभेच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांचा दक्षिण पूर्व भागात १६ गावांमध्ये गाव भेट दौरा सकाळी नऊ ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत आयोजित केला होता. मात्र या गाव भेट दौऱ्या दरम्यान चिकलगी व शिरनांदगी येथील ऐवळे व हेगडे यांच्या कुटुंबातील चार व्यक्तींचे कवठेमहांकाळ मिरज रस्त्यावर पहाटे चार वाजता ट्रक व ट्रॅक्टर यांच्या अपघातामध्ये निधन झाले. आजच्या दौऱ्याचा दुपारचा कार्यक्रम रद्द करून आमदार प्रणिती शिंदे यांनी अपघातग्रस्तांच्या अंत्यविधीस हजर राहून पुढील दौरा रद्द केला.व ऐवळे व हेगडे यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करून त्या कुटुंबाचे सांत्वन केले.



## मधमाशांच्या हल्ल्यात १० विद्यार्थी जखमी

मंगळवेढा - येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आगी मोहोळाच्या माशांच्या हल्यात १० विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे.

मंगळवेढा-पंढरपुर रोडवर शासकिय औद्योगीक प्रशिक्षण संस्था आहे. दि.२ रोजी बाकड्याच्या खालच्या बाजूला आगी मोहोळ बसले होते. मुलांच्या धक्याने ते हालले त्यामुळे विषारी माशांनी मुलावर हल्ला चढवला यामध्ये १० मुले जखमी झाले. मुलांचे अंग व चेहरे सुजले आहेत. नऊ विद्यार्थ्यांना उपचार करून २४ तासाच्या देखरेखी नंतर घरी सोडण्यात आले असून अजूनही गालावर सूज असल्यामुळे एक विद्यार्थी ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे उपचार घेत आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास



माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुलोचना जानकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश कोडलकर डॉ.निखिल कोडलकर यांना विद्यार्थ्यांवर योग्य व यशस्वी उपचार करण्यात यश आले व संभाव्य धोका टळला. यावेळी अधिपरिचारिका फुलन आगलावे, सुवर्णा सगरे, तेजश्री मेटकरी, सारिका कोळेकर, वैशाली शिंदे, सुनीता सातलोलु यांचे सहकार्य लाभले.

## लोकसभा निवडणुकीत शांतता सुव्यवस्थेसाठी मनाई आदेश लागू

सोलापूर : लोकसभा निवडणूक जाहीर होताच आचारसंहिता लागू केली आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी विविध विषयाबाबत पाच आदेश काढले आहेत. नियमाचे पालन न केल्यास संबंधितावर पोलिसी कारवाई होणार आहे. यासंदर्भात पोलिसांनी मनाई आदेश लागू केले आहे. उमेदवारांनी व त्यांच्या प्रतिनिधींनी १० पेक्षा जास्त वाहने वापरू नये. १० पेक्षा अधिक वाहने असतील तर दुसऱ्या ताफ्यामध्ये १०० मिटरचे अंतर असणे आवश्यक आहे. निवडणूक काळात धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थेच्या जागेमध्ये व जवळपासच्या परिसरात तात्पुरती पक्ष कार्यालये निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत स्थापन करता येणार नाही.

# संपादकीय

## प्रस्थापित नेत्यांची अडचण

देशामध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांचे बिगुल वाजले असून राज्याराज्यांमध्ये कमालीची धावपळ सुरू झालेली आहे. मतदारसंघ एकच व इच्छुक अनेक असल्याने प्रस्थापित नेत्यांची आणि पक्षप्रमुखांची अडचण होते आणि डोकेदुखी प्रचंड प्रमाणात वाढते. त्यात बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये एकहाती सत्ता मिळविणे अवघड जात असल्याने सत्ता मिळविण्यासाठी, सत्ता राखण्यासाठी इतर पक्षांशी युती, आघाडी करावी लागते. मग अशा वेळी जागावाटपामध्ये काही जागा मित्र पक्षांनाही सोडाव्या लागतात. त्यातून नाराजी आणखीनच वाढीस लागते. एकतर प्रत्येक मतदारसंघात इच्छुक असताना त्यात मतदारसंघ मित्रांना दिल्यास मातब्बर कार्यकर्ते व प्रस्थापित पदाधिकारी नाराजी व्यक्त करत बंडखोरीची भाषा बोलू लागतात. अनेक जण अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारीही करतात. अर्थात हा मानसिक त्रास निवडणुकीचा अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवसांपर्यंत पक्षप्रमुखांना तसेच पक्षातील मातब्बर नेतृत्वाला सहन करावाच लागतो. अर्थात नाराजीची भाषा बोलणाऱ्या, बंडखोरीची तयारी करणाऱ्या शंभरामध्ये दोन-तीन जणच बंडखोरी करत अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असतात. इतर जण नाराजी व्यक्त करत आपले उपद्रवमूल्य तसेच पक्षातील आपले अस्तित्व दाखवून देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करत असतात. पण हे १०-१५ दिवस पेल्यातील वादळ शमवेपर्यंत पक्षप्रमुखांसाठी प्रतिष्ठेचे असतात. निवडणुकीच्या टप्प्यात पक्षातील वाढती नाराजी हे चित्र जनसामान्यांमध्ये चुकीचा संदेश घेऊन जाते व त्याचा मतदानावरही काही प्रमाणात परिणाम होत असतो. उमेदवारांच्या मुलाखती घेणे, उमेदवार निश्चित करणे, मित्रपक्षांना जागा निश्चित करणे हे सर्व करत असताना पक्षातील नाराजांची, संभाव्य बंडखोरांची मनधरणी करणे हे सर्व एकाचवेळी करताना पक्षप्रमुखांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे निवडणुका म्हटल्यावर हे प्रकार दरवेळी घडतच असतात, सर्वसामान्यांना पाहावयास मिळत असतात. शिवसेनेचे पुरंदरचे विजय शिवतारे यांनी गेल्या काही दिवसांमध्ये राणा भीमदेवी थाटात केलेले राजकीय तांडव महाराष्ट्रातील जनतेने जवळून पाहिले आहे, अनुभवलेही आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटत अनेकांच्या भेटीगाठी घेत अजित पवारांच्याविरोधात रान पेटविले होते. अजित पवारांच्या विरोधात नको त्या थराला जात शिवराळ भाषाही वापरली होती. निवडणूक लढविणारच अशी भीष्मप्रतिज्ञा करत बारामती लोकसभा मतदारसंघ पिंजून काढण्यास सुरुवात केलीही होती. अर्थात शिवतारे यांची बंडखोरी अचानक निर्माण झालेली नाही, तर यामागे राजकीय वादाची पार्श्वभूमी आहे. मागील विधानसभा निवडणुकीत शिवतारेंना पराभूत करण्यात अजित पवारांचे योगदान मोठे होते. विधानसभा निवडणुकीत शिवतारेंना पाडणारच अशी घोषणा करत अजित पवारांनी ती घोषणा खरीही करून दाखविली होती. त्यामुळे या वादामागे राजकीय सुडाची भावना असल्याने बारामती मतदारसंघातले वातावरण गेल्या १५-२० दिवसांत ढवळून निघाले होते. शिवतारे टीकेचा भडीमार व शिवराळ भाषेचा सर्रास वापर करताना अजित पवारांनी मात्र डोक्यावर बर्फ ठेवत कमालीचा संयम दाखविला होता. अखेरीला वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवतारेंची बैठक होऊन बारामती मतदारसंघात निर्माण झालेल्या पुरंदरच्या बंडोबाला थंड करण्यात मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना यश आले आहे. नगर लोकसभा मतदारसंघातही थोड्या फार प्रमाणात तीच परिस्थिती आहे. राष्ट्रवादीतील फुटीनंतर शरद पवारांची साथ सोडत अजित पवार गटात दाखल झालेले आमदार नीलेश लंके हे नगर लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून तयारी करत होते. त्यांनी गावपातळीवर मोर्चेबांधणीही केली होती. पण अजित पवार गटात राहून लोकसभा निवडणूक लढविणे शक्य नसल्याचे दिसताच त्यांनी अजित पवार गटाचा त्याग करत शरद पवार गटाशी मनोमिलाफ करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सातारच्या जागेवर उदयनराजेंचा गेल्या काही महिन्यांपासून दावा होता. स्वत: उदयनराजे हे राज्यसभेचे खासदार असतानाही त्यांनी लोकसभा निवडणूक लढण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावलेली आहे. निवडणूक लढविताना जोपर्यंत पक्षाचे तिकीट जाहीर होत नाही, पक्षाकडून उमेदवारी अर्जासोबत एबी फार्म जोडला जात नाही, तोपर्यंत सर्वकाही अनिश्चित असते. अखेरच्या क्षणी दुसऱ्या पक्षातील एखादा मातब्बर आपल्या पक्षात प्रवेश करून तिकीट घेऊन जातो, ते अनेकदा समजतही नाही. मतदारसंघ एक व इच्छुक अनेक असल्याने त्यागाची भूमिका जोपासत पक्षवाढीसाठी योगदान देणे आवश्यक असते, हीच भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी आपल्या आमदार-खासदारांसमोर मार्गदर्शन करताना मांडली होती.

## माजी आमदार दिलीप माने यांचा पाच वर्षांनंतर पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश



**सोलापूर** - सोलापुरात लोकसभा निवडणुकीचा प्रचाराचा धुराळा उडाला आहे. बरोबर लोकसभा निवडणुकीच्या काळात माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदेनी राजकीय खेळी खेळली आहे. लोकसभा निवडणुकीत कन्या प्रणिती शिंदेंचा भरघोस मतांनी विजय व्हावा यासाठी सुशीलकुमार शिंदेंनी दिलीप मानेचा काँग्रेस प्रवेश घडवून आणला आहे. मुंबईतील टिळक सभागृहात नाना पटोले, सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिलीप माने स्वगृही परतले आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील म तदार दिलीप मानेंच्या प्रवेशाने काँग्रेसकडे झुकले जातील असा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तवला जात आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात सुभाष देशमुख हे दोन वेळा भाजपकडून निवडून आले आहेत. मात्र अनेक दिवसांपासून या मतदारसंघात भाजप विरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात दिलीप मानेंच्या प्रवेशाने काँग्रेसला बळ मिळाले आहे.

दिलीप माने यांनी २८ ऑगस्ट २०१९ रोजी काँग्रेसला रामराम ठोकला होता आणि तानाजी सावंत यांच्या संपर्कात जाऊन शिवसेनेत प्रवेश केला होता. विधानसभेची २०१९ ची निवडणूक त्यांनी दक्षिण सोलापूर मतदारसंघाऐवजी सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून लढवली होती. काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांच्याविरोधात शिवसेनेच्या तिकिटावर लढत दिली होती. मात्र, शिवसेनेचे महेश कोठे यांनीही अपक्ष म्हणून याच मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि मतविभागणीचा फायदा प्रणिती शिंदे यांना झाला होता. शिवसेनेचे कोठे आणि माने या दोघांचाही सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून पराभव झाला. पराभव झाल्यापासून दिलीप माने शिवसेनेपासून अंतर राखून होते.

दिलीप माने शिवसेनेत गेल्याने २०१९ साली दक्षिण सोलापुरात विधानसभेसाठी काँग्रेसकडे तगडा उम `दवार नव्हता. शेवटी काँग्रेसच्या माजी नगरसेवकाला उमेदवारी देण्यात आली होती. या नवख्या उमेदवाराने भाजपच्या सुभाष देशमुखांना कडवी टक्कर दिली होती. जर दिलीप माने शिवसेनेत न जाता दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडून निवडणूक लढवली असती तर नक्कीच भाजपच्या सुभाष देशमुखांना

## मराठा सकल व बहुजन तर्फे आणखी एक सातपुते सोलापूर लोकसभेच्या मैदानात

टेंभुर्णी - हिंदू सकल मराठा, सकल बहुजन समाज व मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांची सोलापूर लोकसभा उमेदवारीसाठी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये हुन्नूर तालुका मंगळवेढा येथील शिक्षक कैलास सातपुते यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातून जनतेची सेवा करण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने उमेदवारी मिळावी असा प्रस्ताव त्यांनी मांडला. त्यामुळे सोलापूर मध्ये लोकसभेच्या रणांगणात भारतीय जनता पार्टी कडून माळशिरसचे आमदार राम सातपुते, काँग्रेसच्या आमदार प्रणितीताई शिंदे यांना उमेदवारी जाहीर झाले असता सकल मराठा कडून कैलास सातपुते इच्छुक आहेत. त्यामुळे आणखीन एक सातपुते उतरलेची चर्चा सुरू झाली आहे.

सदर बैठकीमध्ये कैलास सातपुते म्हणाले की मनोज दादाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या भावना लोकसभेम ध्ये पाठविण्यासाठी मराठा समाजांना आरक्षण देण्यासाठी, उपेक्षित समाजातील स्त्रियांवरील अत्याचार थांबवण्यासाठी, अंगणवाडी सेविकांचा प्रश्न मांडण्यासाठी, शिक्षकांचा प्रश्न लोकसभेत मांडण्यासाठी, इतर समाजातील आरक्षण मिळवून देण्यासाठी मी सतत प्रयत्न करेन. सोलापूर जिल्ह्यामध्ये मराठा समाजाची ताकद मोठ्या प्रमाणात असून दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, म ाळशिरस, अक्कलकोट या तालुक्यांमध्ये मराठा समाज मोठ्या प्रमाणात आहे. एक वर्षाच्या आत मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी जीवाची परवा न करता प्रयत्नशील राहील व आरक्षण मिळवून देईन असेही ते म्हणाले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल घोषणाही देण्यात आल्या. त्यामुळे सोलापूर लोकसभा निवडणुकी बहुरंगी होण्याची चिन्हे आता दिसत आहेत.

## दोन मुलांसह महिला बेपत्ता

सोलापूर : होटगी रस्त्यावरील हत्तुरे नगरातील विवाहिता तिच्या घरातून कोणास काही न सांगता २ मुलासह घरातून निघून गेली आहे. ही घटना गुरुवारी, २८ मार्च रोजी घडली. या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात बेपत्ता नोंद झाली आहे. अंबिका पुंडलिक हत्तुरे (वय २८) ही हत्तुरे वस्तीतून गुरुवारी दुपारी १२ चे सुमारास राहते घरातून रविकांत (वय ७) आणि रतिकांत (वय ६) यांना घेऊन निघून गेली. तिचा नातेवाईकांकडे व सोलापुर शहरात शोध घेतला ती मिळुन आली नाही,म्हणून तिचा भाऊ तिलप्पा देसाई यांनी विजापुर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. महिलेचे वर्णन उंची १६५,रंग गोरा, बांधा मध्यम, भाषा मराठी,कन्नड असे आहे. मुलाचे वर्णन रविकांत रंग सावळा बांधा-मध्यम उंची ३.५ फुट आणि रतिकांत वय ६ रंग-गोरा बांधा मध्यम उंची ३ फुट असे वर्णन आहे.

## घटनेला पॉज करा; पुन्हा सजवा

**सरश्री**



'झाले गेले विसरून जा, पुढे पुढे चला' लोकांना असं म्हणताना तुम्ही ऐकलंच असेल, 'जुन्या गोष्टी विसरून पुढे जावं, भूतकाळ विसरून आपल्या वर्तमान आणि भविष्याचा विचार करावा. जुन्या आठवणींमध्ये काहीही तथ्य नसतं.

व्यक्ती जितक्या जुन्या गोष्टी विसरण्याचा प्रयत्न करते, तितक्या तिला त्या जास्त आठवतात. पण काही गोष्टी अशा असतात, ज्या हृदयात खोलवर कोरल्या जातात. काळाच्या ओघात त्या आठवणी विसरण्याऐवजी अधिकच खोल रुजत जातात आणि मग इच्छा असूनही मनुष्य त्यातून मुक्त होऊ शकत नाही. लहानपणी बोललेली एखादी कठोर गोष्ट कोमल हृदयात इतकं घर करून जाते, की वय वाढलं तरी त्याचा ठसा अस्पष्ट होण्याऐवजी अधिक ठळक होत जातो. मात्र त्या वेळी समजत नसल्याने ती व्यक्ती काहीच बोलू शकत नाही. मात्र नंतर त्याच गोष्टी त्याच्या आयुष्यावर गंभीर परिणाम करू लागतात. जेव्हा तीच गोष्ट वारंवार ऐकायला मिळते, तेव्हा जखमेवरची खपली निघून ती अधिक त्रासदायक ठरते. अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या आठवल्या की म ाणसाला हीन, कमकुवत आणि असमर्थ वाटू लागतं, त्याच्या मूर्खपणाबद्दल पश्चात्ताप होतो, 'जर त्याच वेळी मी प्रत्युत्तर दिलं असतं. त्यामुळे तो प्रसंग आयुष्यभर आठवून तो कायम तणावाखाली राहतो, की 'त्या वेळी मी काहीच का बोलू शकलो नाही?' अशा अनेक घटना काही लोकांच्या आयुष्यात नेहमीच घडतात. प्रत्येकाचं संगोपन वेगवेगळ्या पद्धतीनं झालेलं असल्याने वेगवेगळ्या तणावपूर्ण घटना त्यांच्या जीवनात वरचेवर घडतात. त्यामुळे तुम च्या आयुष्यातील वाईट घटनादेखील वेगवेगळ्या प्रकारे सजवून पाहा. व्हिडीओ फिल्मप्रमाणे त्या घटनेचा वेग कमी जास्त करून, कधी रिवाइंड करून पाहा. एखादा व्हिडिओ रिवाइंड करून पाहिला तर कॉमेडी वाटतो. तुम च्या आयुष्यातील वाईट घटनांना कॉम `डी बनवण्याचा प्रयत्न करा. अशा प्रकारे तुम्ही तणावातून मुक्त होऊ शकाल. या प्रयोगाचा वापर करून तुम्ही तुमच्या आयुष्यातील वाईट घटनांमध्ये बदल करून तुमच्या नावेतील भार निश्चितपणे कमी करू शकाल

**तेजज्ञान फाउंडेशन**
**9921008060**
**helpdesk@tejgyan.org**

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

# स्वेरीत 'क्षितीज २ के २४' कार्यक्रम संपन्न

पंढरपूर – 'क्षितीज २ के २४' सारख्या तांत्रिक इव्हेंटमधून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला संशोधनाकडे नेण्यासाठी प्रेरणा मिळते. हीच प्रेरणा पुढे आपल्या विकासात गती आणते आणि याचे सातत्य ठेवल्यास ती सवय बनते. आपली बौद्धिक प्रगल्भता आपल्याला यशाच्या शिखराकडे घेवून जात असते.' असे प्रतिपादन स्वेरीचे माजी विद्यार्थी व दुय्यम निबंधक (श्रेणी–१) मुद्रांक निरीक्षक तेजस उर्फ खंडू पवळ यांनी केले.




गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये मेसा (मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन), द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), कोलकाता, स्टुडंट्स चॅप्टर आणि अमेरिकन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग (अॅश्रे) ची स्टुडंट ब्रांच यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील 'क्षितीज २ के २४' हा तांत्रिक संशोधन उपक्रम पार पडला. याच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पवळ हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ज्ञ व तंत्रशिक्षण संचालनालयाचे माजी संचालक व गव्हर्निंग बॉडीचे चेअरमन डॉ.एन.बी. पासलकर हे होते. दीपप्रज्वलनानंतर स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्वांचे स्वागत केले.

या तांत्रिक इव्हेंटमध्ये कॅड मास्टर, कॅम्पस रिक्रुटमेंट प्रोसेस (सीआरपी), टेक्नो क्विज, पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट एक्झिबिशन, बीजीएमआय, आयडिया रेस व पोस्टर प्रेझेंटेशन असे आठ प्रकार होते. सायंकाळच्या सत्रात 'स्टडी ऑफ सोलार डिप्लॉयमेंट इन पंढरपूर' या विषयावर स्वेरीत संशोधन करण्यासाठी 'नेहरू फुलब्राईट यु.एस. स्टुडंट रिसर्च प्रोग्राम' च्या माध्यमातून आलेले वर्जीनिया (वॉशिंग्टन, अमेरिका) येथील झॅकरी मरहंका यांच्या हस्ते प्राध्यापकांच्या उपस्थितीत विजेत्यांना पुरस्कार वितरण करण्यात आले.

यावेळी विभागप्रमुख डॉ.एस.बी. भोसले, अॅश्रे स्टुडंट ब्रांचचे सल्लागार प्रा. डी.डी. रोंगे, मेसा समन्वयक प्रा. एस.एन. मोरे, आय.ई.आय., कोलकत्ता स्टुडंट चॅप्टरचे समन्वयक प्रा.डी.टी. काशीद, प्राध्यापक वर्ग, मेसाच्या अध्यक्षा आरती चौगुले, सचिवा आकांक्षा हिंगमिरे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वरी यादव, सुप्रिया शेलार व डॉ.वाय.एम. खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर मेसाचे उपाध्यक्ष अभिषेक मोर्डे यांनी आभार मानले.

# सोलापुरातुन उमेदवारीच्या शर्यतीतील नाराज लक्ष्मण ढोबळे उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीला




**पंढरपूर** – सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारीच्या शर्यतीत असलेले माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे व त्यांची कन्या अॅड कोमल ढोबळे साळुंखे यांची उमेदवारी डावल्यानंतर नाराज झाल्यामुळे त्याचे पडसाद भविष्यात उमटू नये यासाठी भाजप नेतृत्वाने गंभीर दखल घेत त्यांची नाराजी मुंबई येथे बोलावून दूर करण्याचा प्रयत्न केला.

सोलापूर लोकसभेसाठी भाजपाकडून सलग दहा वर्षे उमेदवार मोठ्या फरकाने विजय होऊन देखील या मतदारसंघात केंद्रातील व राज्यातील सत्तेचा उपयोग करून घेता आला नाही. त्यामुळे या मतदारसंघातील प्रश्न तसेच रखडल्यामुळे मतदारसंघात नाराजीचा सूर मोठ्या प्रमणात सुरु होता. त्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर लोकसभेची निवडणूक लढवण्यासाठी डझन भरापेक्षा अधिक नावे इच्छुक होती. मात्र काँग्रेस कडून फक्त आ. प्रणिती शिंदे हे एकमेव नाव अखेरपर्यंत चर्चेत राहिले परंतु भाजपकडून दररोज एक नाव बदलत बदलत अखेर माळशिरसचे आ. राम सातपुते यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर स्थानिक इच्छुक दावेदारातून नाराजी पसरली. त्या नाराजीवर अॅड कोमल ढोबळे– साळुंखे यांनी त्याच दिवशी आपले व्हाॅट्सअप स्टेटस खा.शरद पवार यांच्या समवेतील जुने फोटो टाकत लावा तर्क असा संदेश दिल्याने जिल्ह्याच्या राजकारणात खळबळ उडाली.याची दखल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत जिल्ह्यातील अनेक नाराज घटकांना मुंबईतील सागर बंगल्यावर बोलून त्यांची नाराजी दूर करत कामाला लागण्याची सूचना दिल्या त्यामध्ये भाजप प्रवत्ते माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांना देखील बोलावून त्याबाबत सूचना दिल्या. आपली नाराजी दूर करून न्याय देवू असा शब्द दिला. यावेळी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी जिल्ह्यातील पक्षीय उमेदवार समोर असलेली आव्हाने याविषयी माहिती दिली.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी उत्साहात साजरी

पंढरपूर – पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री.विठ्ठल रुक्मिणी देवस्थान म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. विठूरायावर केशर आणि गुलालाची उधळण केल्यावर अवघा रंग एक झाला , रंगी रंगला श्रीरंग या अभंगाची प्रचिती आली. वसंतोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे रंगपंचमी. वसंत पंचमी पासून रंगपंचमी पर्यंत दररोज विठूरायाला पांढऱ्या पोशाखावर गुलाल टाकून पूजा केली जाते. सलग महिनाभर हा दिनक्रम सुरु असतो. या उत्सवाची सांगता रंगपंचमीला होते.



रंगपंचमी दिवशी दुपारी ४.३० वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची पाद्यपुजा व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या शुभहस्ते सपत्नीक करण्यात आली. देवाच्या अंगावर केशरयुक्त रंग व गुलाल टाकण्यात आला. नंतर डफाची पुजा करुन नामदेव पायरी– तुकाराम भवन – पश्चिम द्वार – चौफाळा – पश्चिम द्वार – व्हीआयपी गेट – नामदेव पायरी अशी मंदिर प्रदक्षिणा करून डफाची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. सदर मिरवणुकीमध्ये रंगाची उधळण करून व मानकऱ्यांना प्रसाद देवून वसंतोत्सवाची सांगता करण्यात आली. या उत्सवाचे सर्व नियोजन विभाग प्रमुख संजय कोकीळ व नित्योपचार विभागातील कर्मचाऱ्यांनी केले होते. यावेळी उत्साहात मंदीर समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

# उद्योजक राजू खरे यांच्या भूमिकेकडे लक्ष!

**पंढरपूर** – सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. सोलापूर लोकसभा मतदार संघातून महविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवाराकडून विविध राजकीय नेत्यांच्या भेटीगाठी सुरु आहेत. याच मतदार संघातून मोहोळ विधानसभा मतदार संघातून पंढरपूरचे सुपुत्र उद्योजक राजू खरे यांची मोठी ताकद आहे. यामधून पंढरपूर,मोहोळ आणि उत्तर सोलापूर या भागातील मतदारांचा समावेश आहे. तर या लोकसभा निवडणुकीत ही ताकद नेमकी कोणाच्या बाजूने जाणार? यासाठी खरे यांच्या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे.

मागील आठ वर्षापासून मोहोळ राखीव विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी उद्योजक राजू खरे हे प्रयत्नशील आहेत. मोहोळ मतदार संघात राजू खरे यांचा मोठा गाजावाजा झाला आहे. गावोगावी त्यांना मानणारे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात तयार झाले आहेत. त्यामुळे खरे यांचा स्वतंत्र राजकीय गट तयार झाला आहे.



उद्योजक राजू खरे यांनी आपल्या मोहोळ विधानसभा मतदार संघासह पंढरपूर विधानसभा मतदार संघातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध विभागातील मंत्र्यांकडून कोट्यवधीचा निधी मिळविला आहे. त्यामुळे अनेक भागात विकासकामे सुरू आहेत.

मोहोळ विधानसभा मतदार संघात येत असलेल्या मोहोळ,पंढरपूर, उत्तर सोलापूर भागातील जनतेसाठी खरे यांनी मागेल त्याला पाणी, मागेल त्याला रस्ता देण्याची महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. याचबरोबर आरोग्य सेवेसाठी मोठी आर्थिक मदत करीत विविध शाळेसाठीही लाखो रुपयांची मदत मिळवून दिली आहे. यामधून मोहोळ मतदार संघातील बहुसंख्य गावातून वरील मदत पोहचली आहे. त्यामुळे राजू खरे यांना मानणारा मोठा प्रमाणात वर्ग तयार झाला आहे.

आगामी विधानसभा निवडणूक ते कोणत्या पक्षाकडून लढविणार आहेत. याबाबत कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही. मात्र विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी खरे यांची भूमिका ठाम आहे. त्यामुळे या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्याकडे असलेले मताचे मोठे वजन कोणाच्या पारड्यात टाकणार याकडे खरे समर्थक यांचे लक्ष लागून राहिले आहे.

राजू खरे हे मागील अनेक वर्षापासून कडवट शिवसैनिक आणि चळवळीत वाढलेले नेतृत्व आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार त्यांच्या अंगी आहेत. सध्या ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू म्हणून सर्वश्रृत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनीही खरे यांना आमदार नसतानाही स्वतंत्र खास बाब म्हणून निधी दिला आहे. त्यामुळे खरे यांची ताकद या लोकसभा मतदार संघात कोणाच्या बाजूने

# लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी भाजपला धडा शिकवा- प्रणिती शिंदे


**सोलापूर** – 'अब की बार, चारसौ पार'चा नारा देण्यामागे भाजपला देशातील लोकशाही आणि संविधान नष्ट करून हुकूमशाही आणून सामान्य जनतेची पिळवणूक करायची आहे. 'मूँह में राम बगल में छुरी' हीच भाजपची प्रवृत्ती आहे. लोकशाही आणि राज्य संविधानाचे रक्षण करण्यासाठी भाजपला धडा शिकवा, अशी हाक सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार, आमदार प्रणिती शिंदे यांनी दिली.



अक्कलकोट तालुक्यातील प्रचार दौऱ्यात दुसऱ्या दिवशी चपळगाव, नन्हेगाव, पितापूर व अन्य गावांतून आमदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. रणरणत्या उन्हात झालेल्या या दौऱ्यात पोहोचल्यानंतर तेथे एखाद्या पारावर कापडी मंडपाखाली किंवा समाज मंदिरात संवाद होत असताना त्यात महिलांचा लक्षणीय प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले. महिलांमध्ये घोळक्यात शिरून त्यांच्याशी हितगूज करीत मने जिंकण्यावर आमदार प्रणिती शिंदे यांचा भर पाहावयाला मिळाला.

ग्रामस्थांशी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात संवाद साधताना आमदार प्रणिती शिंदे स्थानिक विकासाचे प्रश्न मागील दहा वर्षात भाजपच्या खासदारांकडून कसे दुर्लक्षित आहेत, हे थेट ग्रामस्थांच्या मुखातूनच जाणून घेताना भाजपच्या विरोधात खदखद उजेडात आणण्याचा प्रयत्न करतात. दुष्काळाचे संकट संपूर्ण सोलापूर लोकसभा मतदारसंघावर ओढूनही त्यातील सर्व सहापैकी एकही तालुक्याला दुष्काळी मदत मिळाली नाही, या मुद्यावर बोट ठेवून आमदार प्रणिती शिंदे यांनी भाजपवर टीकास्त्र सोडतात.

# मी केलेली विकासकामे कार्यकर्ते नी जनतेला सांगावी– रणजितसिंह नाईक निंबाळकर



**सोलापूर** – भाजपाच्या माझ्या कार्यकर्त्यांनी आपल्या या माढा लोकसभा मतदारसंघांध्ये मी केलेल्या विकास कामाची माहिती कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावी. असे आज सांगोला येथे भाजपाचे माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी आज सांगोला येथे कार्यकर्त्यांच्या मेळावा मध्ये आपले मनोगत व्यक्त केले.

सांगोल्याचा पाणी प्रश्न व त्यासाठी लागणारा निधी आम्ही दिलेला आहे. असे त्यांनी आवर्जून सांगितले. सांगोला तालुक्यामधून मला भरघोस मतदान मिळणार आहे. याची ग्वाही आमदार शहाजी बापू पाटील आणि दीपक आबा साळुंखे पाटील यांनी दिल्यामुळे या परिसरातून मला भरपूर मताधिक्य मिळणार आहे.

सांगोला तालुक्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये त्यांनी आपली भावना व्यक्त केली. रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी देशांमध्ये सर्वात जास्त विकास कामे केल्याची त्यांनी माहिती सांगितली. अशा या विकास कामे करणाऱ्या उमेदवाराला सांगोला तालुक्यातील जनता ही कदापि विसरणार नाही. असे आमदार शहाजी बापू पाटील यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

सांगोला तालुक्याचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या गटाचे दीपक आबा साळुंखे पाटील यांनी रंजीत सिंह नाईक निंबाळकर यांना मत देणे म्हणजे मोदी यांना मत देण्यासारखे आहे. आपल्या देशाला मोदी हे सर्वोच्च स्थानी नेणारे नेतृत्व आपल्याला लाभलेले आहे. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपल्याला रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या माध्यमातून एक प्रतिनिधी लोकसभेमध्ये पाठवायचा आहे. तरी सांगोला तालुक्यातील जनतेने रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे. असे आवाहन दीपक आबा साळुंखे पाटील यांनी आज रोजी केले. या कार्यक्रमाला उपस्थित म्हणून सांगोला तालुक्याचे शिवसेना शिंदे गट चे आमदार शहाजी बापू पाटील तसेच माजी विधान परिषद आमदार दीपक आबा साळुंखे पाटील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे या तालुक्यातील सर्व भाजपा पदाधिकारी त्याचप्रमाणे शिवसेना शिंदे गट चे पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांचे पदाधिकारी कार्यकर्ते हे उपस्थित होते.

# जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये येथे उष्माघात कक्ष सुरू

सोलापूर (प्रतिनिधी) : सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तींना उष्माघात होण्याची शक्यता असल्याने तीव्र उन्हात फिरु नये तसेच नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केले आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा ४५ अंशा पर्यंत पोहचतो. आताच मार्च अखेर शहरातील तापमान ४२ अंश इतके झाले आहे. त्यामुळे उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे उष्माघात कक्ष सुरु केले आहेत. प्रत्येक कक्षात लागणाऱ्या प्राथमिक गरजेची पूर्तता करण्यात आली आहे. सध्या शेतीची कामे सुरु असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते. अशा रुग्णांना त्वरित उपचार मिळावेत यासाठी आरोग्य विभागाने जिल्ह्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरु केले आहेत.

आरोग्य केंद्रात उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन या सह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच वाढत्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या आजारांसह होणारे दुष्परिणामाबाबत जन जागृतीही करण्यात येत आहे.

# आ.प्रणितीताई यांना डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली १७ गावातून मताधिक्य देणार: संग्राम जाधव



सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आ.प्रणितीताई शिंदे यांना मोहोळ विधानसभेला जोडलेल्या पंढरपूर तालुक्यातील फुलचिंचोली, तारापूर, आंबे, चळे, मगरवाडी, खरसोळी, पोहोरगांव, पुळुजवाडी, आंबेचिंचोली, विटे, शंकरराव, पुळुज, सरकोली कोंढारकी, रांझणी, ओझेवाडी, नळी या १७ गावातून सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मताधिक्य देणार अशी ग्वाही सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्राहक संरक्षण विभागाचे जिल्हाध्यक्ष संग्राम जाधव यांनी दिली.

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्राहक संरक्षण विभाग जिल्हाध्यक्ष संग्राम जाधव यांनी १७ गावातून ग्राहक संरक्षण विभागाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेमार्फत प्रचार यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार आ. प्रणितीताई शिंदे यांचा लवकरच १७ गावामध्ये दौरा होणार असून दौऱ्यात त्या १७ गावांना भेटी देऊन ग्रामस्थांच्या अडी-अडचणी जाणून घेणार आहेत. सध्या विद्यमान खासदार जय सिद्धेश्वर महास्वामी कसलेही फिरकले नसल्याने लोकांमध्ये भाजप सरकारच्या विरोधात असंतोष असून काँग्रेसचे उमेदवार आ. प्रणितीताई शिंदे यांना जनतेमधून पाठिंबा व लोकप्रियता मिळत आहे.

आमदार प्रणितीताई शिंदे यांचे कार्य वाखाण्याजोगे आहे, त्यांनी 'सोलापूर शहर मध्य' या विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य गोरगरीब जनतेची कामे केली असून, त्यांची युवा वर्गात क्रेझ आहे. त्यामुळे आमदार प्रणितीताई शिंदे सोलापूर लोकसभा मतदारसंघातून चांगल्या मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्राहक संरक्षण विभाग जिल्हाध्यक्ष संग्राम जाधव यांनी दिला.

# शिवसेना ठाकरे गटाकडून निवडणूक केली प्रतिष्ठेची!



**पंढरपूर-** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची पंढरपूर येथील हॉटेल विठ्ठल इन येथे बैठक पार पडली.यावेळी सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेना सज्ज असल्याचे दिसून आले.

या बैठकीत संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी त्यांनी आघाडीच्या नेत्यांबरोबर पुढील राजकारणाची दिशा ठरवण्यासाठी शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांची चर्चा झाली असून पुढील काळात एकजुटीने निवडणुकीशी सामोरे जाण्याचा निर्णय झाला असून राज्यात आघाडीच्या उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर सर्व शिवसैनिक आघाडीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी कामाला लागले असल्याचे सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की देशात लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून जनतेवर लोकशाही टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. यावेळी त्यांनी सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्यावर संकष्टी चतुर्थी दिवशी नागरिकांसाठी मटणाची पार्टी करून भावनेशी खेळण्याचा आरोप करत सांगोल्याचे गद्दार आमदार शहाजी बापू पाटील यांच्या विरोधात शिवसैनिक मैदानात उतरणार असल्याचा पाटील यांना इशारा दिला.

माढ्यात तुतारी आणि सोलापुरात आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते जोमाने कार्य करतील आणि कमळ उपटून काढतील असा विश्वास कोकिळे यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेना उपनेते शरद कोळी, शिवसेना उपनेते अस्मिताताई गायकवाड, शिवसेना प्रवक्ते लक्ष्मण हाके, जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, माजी जिल्हाप्रमुख साईनाथ अभंगराव, जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख पूनमताई अभंगराव, आशाताई टोणपे, उपजिल्हाप्रमुख सुधीर अभंगराव, जिल्हा युवा अधिकारी गणेश इंगळे, जिल्हा युवा अधिकारी सचिन बागल, जिल्हा संघटिका वैद्यकीय राजश्री क्षीरसागर, जिल्हा संघटक वैद्यकीय शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांची बैठक पार पडली.

# लक्ष्मण ढोबळे यांनी घेतली केंद्रीयमंत्री आठवले यांच्यासह महायुतीमधील नेत्यांची भेट



सोलापूर - देशभरात लोकसभा निवडणुकीचे वारे गतीने वाहू लागले आहे. महाराष्ट्रात भाजपा व मित्रपक्षाचे सर्वच नेते जोमाने कामाला लागले असून प्रत्येक मतदारसंघातील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून आहेत. शुक्रवारी माजीमंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी मुंबई येथे आरपीआयचे राष्ट्रीय नेते तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले, शिवसेनेचे नेते तथा माजीमंत्री विजय शिवतारे, भारतीय जनता पार्टीचे आमदार प्रवीण दरेकर, आमदार राणा जगजितसिंह पाटील व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची घेऊन निवडणुकीसंदर्भात चर्चा केली.

# शिवाजी ननवरे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती



अकलूज - येथील शिवाजी ज्ञानेश्वर ननवरे यांनी जम्मू काश्मीर येथे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नतीद्वारे नुकताच पदभार स्वीकारला.

शिवाजी ज्ञानेश्वर ननवरे हे १९९२ साली केंद्रीय राखीव पोलीस दलमध्ये भरती झाले होते. नागपूर आणि जयपूर येथे ट्रेनिंग पूर्ण करून पंजाब-अमृतसर या ठिकाणी त्यांची बदली झाली. त्यानंतर मणिपूर, आसाम, गडचिरोली, उत्तर प्रदेश, जम्मू काश्मीर आदी ठिकाणी त्यांनी उत्तम सेवा बजावली. त्यांनी गडचिरोली येथील नक्षलवाद्यांशी चकमक असो की, पंजाब, जम्मू काश्मीर येथील अत्यंत प्रतिकूल-कठीण प्रसंगातही त्यांनी जीवाची पर्वा न करता सेवा चोख बजावली.

# भोसे पाणीपुरवठा योजना दुरुस्तीसाठी टंचाई मधून २९ लाख रुपये मंजूर



मंगळवेढा - मंगळवेढा तालुक्यातील भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी टंचाई आराखड्यामधून २९ लाख ४९ हजार ७९२ रुपये मंजूर केले असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

सदर योजनेच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागात कायमस्वरूपी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारेच या भागाची तहान भागत आहे परंतु या योजनेचे काम अतिशय निकृष्ट झाल्याने लोकांना पिण्यासाठी व्यवस्थित पाणी मिळत नाही सध्या या भागातील बोर विहिरींच्या पाण्याची पातळी खोलवर गेली असल्यामुळे दुसरा पाण्याचा स्त्रोत नाही त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी खूप हाल होत आहेत या योजनेत असणाऱ्या गावांना टँकरही दिले जात नाहीत त्यामुळे तात्काळ या योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी मिळावा तसेच ज्या ठिकाणी ही योजना पोहोचली नाही त्या वाड्या वस्त्यांवर टँकर मंजूर करावा अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी पत्राद्वारे केली होती त्यानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी २९ लाख ४९ हजार ७९२ रुपये मंजूर केले असून कार्यरंभ आदेशानंतर ४५ दिवसात काम पूर्ण करण्याचा सूचना प्रशासनास दिले आहेत.

या मंजूर रकमेमधून लिकेजेस काढणे, पाण्याची गळती कमी करणे,पाईप दुरुस्ती करणे,इयर वॉल बदलणे, ही कामे करण्यात येणार आहेत त्याचबरोबर ही कामे करत असताना सदर काम व्यवस्थित करून घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असून या योजनांची पाहणी उपविभागीय अधिकारी, संबंधित गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी स्वतः जाऊन करून काम व्यवस्थित व चांगल्या दर्जाचे करून घ्यायचा सूचना त्यांना दिल्या आहेत.

सध्या उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे तीव्र पाणीटंचाई भासत असून हा निधी मंजूर झाल्यामुळे लवकरच या योजनेची दुरुस्ती होऊन व्यवस्थित पाणी मिळेल असे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.



# स्वामी समर्थांच्या दर्शनाने प्रणिती शिंदे यांच्या अक्कलकोट दौऱ्याला सुरुवात

सोलापूर- सोलापूर राखीव लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी शुक्रवारी आपल्या अक्कलकोट दौऱ्याला मोठ्या उत्साहात सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी श्री स्वामी समर्थांचे त्यांनी दर्शन घेऊन मंदिरात पूजा केली.

यावेळी सोबत माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, तालुका अध्यक्ष शंकर म्हेत्रे, युवा नेत्या शितल म्हेत्रे, युवा नेते प्रथमेश म्हेत्रे, मनोज यलगुलवार यांच्यासह इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दौऱ्यात अक्कलकोट तालुक्यातील गावोगावी उमेदवार प्रणिती शिंदे तसेच म्हेत्रे परिवारावर ग्रामस्थांनी जेसीबीतून पुष्प वर्षाव करत जंगी स्वागत केले.

भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहेया शब्दात एवढी ताकद आहे की, कोणतेही आव्हान ऊचलण्यासाठी एक प्रकारची ताकद यामुळे मिळते. नक्कीच स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने अक्कलकोटसह सोलापूर लोकसभेतील जनतेची सेवा करण्याची संधी द्या असे आवाहन उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केले.तरअन्यायी सरकारला तडीपार करण्यासाठी प्रणितीताई शिंदे यांना अक्कलकोट तालुक्यातून जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिली.

# क्रांतिसूर्य तरुण मंडळाची नूतन कार्यकारणी जाहीर



पंढरपूर -विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील क्रांतिसूर्य तरुण मंडळ आंबेडकर नगर या मंडळाची जयंती उत्सव समितीची बैठक अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी विविध सामाजिक कार्यक्रम राबवण्याबत चर्चा करण्यात आली. व २०२४ ची उत्सव समिती जाहीर करण्यात आली. यावेळी अध्यक्ष पदी गोविंद म्हेत्रे,उपाध्यक्ष आकाश आगलावे, सचिव मारुती कांबळे, कार्याध्यक्ष गणेश सर्वगोड, खजिनदार सुरज कुंचे, यावेळी क्रांतिसूर्य तरुण मंडळातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.